जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १९७ | शुक्रवार, ६ फेब्रुवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER


## नो कॅश काऊंटर हॉस्पिटलची घोषणा

### आरोग्यदूत युवराज काकडे यांचा विकास संकल्प

**लोणी काळभोर, ता. ५ :** एकीकडे विकासकामांचे सूक्ष्म व्हिजन तर दुसरीकडे धनाढ्य शक्तीचा वापर अशा रंजक वळणावर थेऊरआव्हाळवाडी जिल्हा परिषद व पंचायत समितीची निवडणूक येऊन ठेपली आहे. या पार्श्वभूमीवर रुग्णसेवाच ईश्वरसेवा ही भावना उराशी बाळगत थेऊर-कुंजीरवाडी-आळंदी म्हातोबाची पंचायत समिती गणातील राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार युवराज काकडे यांनी गोरगरीब नागरिकांसाठी नो कॅश काऊंटर हॉस्पिटल उभारण्याचा महत्त्वपूर्ण संकल्प जाहीर केला आहे.



एकही रुपया न घेता, अगदी केसपेपरसाठीही पैसे न आकारता सर्वसामान्य नागरिकांना मोफत उपचार देणारे हॉस्पिटल उभारणार आहेत, अशी ठाम माहिती युवराज काकडे यांनी पुणे प्राईम न्यूजशी बोलताना दिली. यासाठी आवश्यक असलेले नो कॅश काऊंटर मॉडेल प्रत्यक्षात आणले जाणार असून, काम करणाऱ्या उमेदवारांनाच जिल्हा परिषद व पंचायत समितीत पाठवा, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी बोलताना काकडे म्हणाले, ही निवडणूक आता धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी झाली असून, सर्वसामान्य जनतेनेच ही लढाई हातात घेतली आहे. प्रत्येक गावात, वाड्या-वस्त्यांमध्ये आमचे काम पोहोचले आहे. कार्यपरिचय व जाहीरनाम्याच्या माध्यमातून आम्ही पुढील पाच वर्षांचे ठोस व्हिजन नागरिकांसमोर मांडले आहे. कामाची माणसं कोण आणि निवडणुकीपुरती येणारी माणसं कोण, याचा फैसला मतदारांनी करावा. विरोधकांकडे कोणताही कार्यअहवाल अथवा विकास आराखडा नसल्याने सुज्ञ मतदारांनी त्यांना ओळखले असून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असल्याचा दावा त्यांनी केला.

दरम्यान,आरोग्यसेवेच्या माध्यमातून आजवर १५ हजार रुग्णांना मदत, ७ हजार नागरिकांना मोफत चष्मे, १५० हृदयशस्त्रक्रिया पूर्णतः मोफत, तर ३५० हून अधिक रुग्णांवर ५० टक्के सवलतीत शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत. विविध आजारांवरील उपचारांत मदत करून तब्बल दोन हजार नागरिकांना जीवनदान देण्यात आले आहे.

हे काम मी श्रेयासाठी नव्हे, तर कर्तव्य म्हणून केले, असे नम्रपणे सांगत आरोग्यदूत युवराज काकडे यांनी गोरगरिबांच्या सेवेसाठी हा संघर्ष पुढेही अखंड सुरू ठेवणार असल्याचा विश्वास व्यक्त केला आहे.

## कोरेगाव मूळ गटातील मनोज चौधरींसह तिन्ही उमेदवार अजित दादांच्या विचारांचे : माऊली कटके

### सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर-हवेलीतील मतदारसंघात विकास असाच सुरू राहणार

**उरुळी कांचन, ता. ५ :** जिल्हा परिषद गट व पंचायत समिती गणासाठी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने जाहीर केलेले उमेदवार हे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या विचारांचे असून, दादांनी स्वतः घोषित केलेले हे शेवटचे उमेदवार आहेत. पवार कुटुंबाने खेड्यापाड्यांत कालवे, पाणीपुरवठा आणि पायाभूत सुविधा पोहोचवून विकासाचा ठोस पाया घातला असून, ग्रामीण व शहरी भागातील सर्वांगीण प्रगती ही त्यांच्या दूरदृष्टीचे फलित आहे, असे ठाम प्रतिपादन शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटकेयांनी केले.

आगामी काळातही उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर-हवेली मतदारसंघात असाच विकास सुरूच राहील. त्यामुळे सर्व नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करून अजितदादांना खरी श्रद्धांजली अर्पण करावी. असे भावनिक आवाहनही आमदार कटके यांनी यावेळी केले.



नायगाव (ता. हवेली) ग्राम पंचायत हद्दीत कोरेगाव मूळ-केसनंद जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार सुरेखा रमेश हरगुडे, कोरेगाव मूळ पंचायत समिती गणाचे उमेदवार कृषिराज उर्फ मनोज चौधरी व केसनंद गणातील उमेदवार प्रमोद हरगुडे यांच्या प्रचारार्थ आयोजित कोपरा सभेत ते बोलत होते.

यावेळी यशवंत सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष सुभाष आप्पा जगताप, कोरेगाव मूळ-केसनंद जिल्हा परिषदेच्या उमेदवार सुरेखा रमेश हरगुडे, कोरेगाव मूळ पंचायत समिती गणाचे उमेदवार कृषिराज उर्फ मनोज चौधरी, हवेली तालुकाध्यक्ष दिलीप वाल्हेकर, यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक कुंडलिक थोरात, पंचायत समितीचे माजी सदस्य बाळाआप्पा चौधरी, माजी सरपंच तानाजी बापू चौधरी, रघुनाथ आण्णा चौधरी, तानाजी चौधरी, सचिन हगवणे, सामाजिक कार्यकर्ते अमोल चौधरी, आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार कटके पुढे म्हणाले, आगामी काळात उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली शिरूर-हवेली मतदारसंघात विकासाची गती अधिक वेगाने सुरू राहील. त्यामुळे राष्ट्रवादीच्या उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करून अजितदादांना खरी श्रद्धांजली अर्पण करा, असे भावनिक आवाहन त्यांनी केले. राज्यात कामाच्या जोरावर ओळख निर्माण करणारे नेतृत्व म्हणजे अजित पवार. शेतकऱ्याच्या मुलाला आमदार करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेऊन त्यांनी सर्वसामान्यांशी असलेली नाळ अधिक घट्ट केली. नागरिकांच्या छोट्या-मोठ्या प्रश्नांची तत्काळ दखल घेणारी त्यांची प्रतिमा जनतेने अनुभवली आहे. यशवंत सहकारी साखर कारखान्याचा अंतिम टप्प्यातील प्रश्न असो किंवा उरुळी कांचनपर्यंत मेट्रो आणण्याचा विषय हे सर्व अजितदादांच्या संकल्पनेतूनच साकार होणार आहे.

दरम्यान, आगामी अधिवेशनानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीकडे अर्थ खात्याची जबाबदारी निश्चितपणे येईल आणि त्यामुळे विकास निधीची कोणतीही कम तरता भासू दिली जाणार नाही, असा ठाम विश्वासही कटके यांनी व्यक्त केला.

शिरूर-हवेलीतील राष्ट्रवादीचे सर्व उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन त्यांनी नागरिकांना केले. यावेळी दिलीप वाल्हेकर, सुरेखा हरगुडे व कृषिराज उर्फ मनोज चौधरी यांनीही आपली मनोगते व्यक्त केली.

#### चौधरी कंपनीचा अपप्रचार : सुभाष जगताप

अजितदादांनी या भागात केलेली विकासकामे आणि आमदार माऊली कटके यांच्या माध्यमातून सुरू असलेली कामे जनतेसमोर आहेत. हे दादांनी दिलेले शेवटचे उमेदवार असून मतदार त्यांना फसवणार नाहीत. देशाचे पंतप्रधान खुद्द गुजरातचे आहेत. ते वाराणसी येथून निवडणूक लढतात. तर चंद्रकांत पाटील कोल्हापूरचे ते पुण्यातून निवडणूक लढतात. ते त्यांच्या पक्षाला व त्यांना चालतंय व त्याच पक्षाचे उमेदवार आरोप करतात. चौधरी कंपनीचा अपप्रचार केला जात असला, तरी त्यांनी केलेली कामे सगळ्यांना मान्य आहेत. कामे चालतात, मग उमेदवार का चालत नाहीत? असे आरोप पूर्णतः चुकीचे आहेत. या गटातील तिन्ही उमेदवार निश्चितच मोठ्या मताधिक्याने विजयी होतील.

## कोरेगाव मूळ गणातील निवडणूक ही सामान्य कार्यकर्ता विरुद्ध प्रस्थापित सत्ताकेंद्रे : सुरज चौधरी

**उरुळी कांचन, ता. ५ :** कोरेगाव मूळ पंचायत समिती गणात सध्या निवडणूक केवळ उमेदवारांची न राहता, ती थेट सामान्य कार्यकर्ता विरुद्ध प्रस्थापित सत्ताकेंद्रे अशी लढाई बनली असल्याचे मत भाजपचे कोरेगाव मूळ पंचायत समिती गणातील उमेदवार सुरज चौधरी यांनी केले आहे.

चौधरी म्हणाले, अधिकृत उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरलेल्या सामान्य कुटुंबातील या उमेदवाराने थेट जनतेच्या जोरावर निवडणूक लढवण्याचा निर्धार केला असून, गणातील सर्व मतदारांचे आशीर्वाद घेत गावोगावी संपर्क सुरू केला आहे.

कोरोना काळापासून ते आजपर्यंत जिल्हा परिषद शाळा, नऊ गावांतील नागरिकांच्या समस्या, मूलभूत



सुविधा यासाठी सातत्याने केलेले काम मतदारांनी प्रत्यक्ष पाहिले आहे. त्यामुळेच मतदार अत्यंत सुज्ञ असून, कोण काम करणारा आहे आणि कोण केवळ राजकारण करणारा आहे, हे ओळखण्याची क्षमता जनतेकडे आहे, असा ठाम विश्वास चौधरी यांनी यावेळी व्यक्त केला.

मी कोणत्याही प्रस्थापित घराण्याचा वारसदार नाही. माझ्यामागे सत्ता नाही, सहकारातील मोठी नावे नाहीत. माझ्या मागे आहे ती फक्त जनता, मतदार बंधू-भगिनी आणि सामान्य कार्यकर्ते, असे ठणकावून सांगत सुरज चौधरी यांनी विरोधकांवर अप्रत्यक्ष हल्ला चढवला. एकीकडे एकटा सामान्य कार्यकर्ता आणि दुसरीकडे सहकारातील प्रस्थापित नेतृत्व अशी ही लढाई आज घरोघरी मतं मागण्यापर्यंत येऊन ठेपली आहे.

वातावरण जाणूनबुजून भावनिक करण्याचे, दहशत निर्माण करण्याचे, फोनद्वारे दबाव टाकण्याचे प्रकार सुरू असल्याचा गंभीर आरोपही यावेळी करण्यात आला. जे लोक कालपर्यंत आमच्यासोबत फिरत होते, ते आज उघडपणे येण्यास घाबरत आहेत. इकडून फोन, तिकडून प्रेशर-असा दबाव टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. पण ही जनता भीतीला घाबरणारी नाही, असेही चौधरी यांनी यावेळी सांगीतले.

मी माझ्या कामाची जाहिरात स्वतः करत नाही. पत्रकारांनी, नागरिकांनी गावात जाऊन चौकशी करावी. माझं काम हेच माझं भांडवल आहे, असे सांगत त्यांनी विरोधकांच्या प्रचारपद्धतीवर टीका केली. नऊ गावांतील जनता न्याय देईल, सामान्य कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहील, असा विश्वास व्यक्त केला.

दरम्यान, मतदार राजाने येत्या ७ तारखेला कमळ चिन्हासमोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन सुरज चौधरी यांनी यावेळी केले. जनशक्ती माझ्या मागे आहे. सत्ता येते-जाते, पण जनतेचा आशीर्वादच खरी ताकद आहे, त्यामुळे मतदारांनी कोणत्याही भूलथापांना बळी न पडता कोरेगाव मूळ जिल्हा परिषद गटातील तिन्ही उमेदवारांना प्रचंड बहुमतांनी विजयी करा असे आवाहन सुरज चौधरी यांनी यावेळी केले.

## एका व्यक्तीच्या हट्टासाठी लेकीचा आवाज दाबला; भाजपच्या उमेदवारी रद्दवर पूजा सणस यांचा आरोप

**उरुळी कांचन, ता. ०५ :** पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एका सामान्य कुटुंबातील सामाजिक कार्यकर्तीची उमेदवारी अचानक रद्द करण्यात आली. भारतीय जनता पार्टीकडून तयारी करण्यास सांगूनही एबी फॉर्मच्या दिवशीच उमेदवारी डावलण्यात आल्याचा गंभीर आरोप पूजा दीपक सणस यांनी केला आहे. कोणतेही ठोस कारण नसताना केवळ एका व्यक्तीच्या अट्टहासापोटी हा निर्णय घेण्यात आल्याचा थेट हल्लाबोल त्यांनी केला.

पक्षाने तयारी करण्यास सांगितल्यानंतर मी पूर्ण ताकदीने मैदानात उतरले. जनसंपर्क वाढवला, महिलांच्या प्रश्नांवर काम केले, परिसरातील नागरिकांच्या अडचणी समजून घेतल्या. मात्र एबी फॉर्म देण्याच्या दिवशी अचानक माझी उमेदवारी रद्द करून दुसऱ्यालाच संधी देण्यात आली, असा संतप्त सवाल पूजा सणस यांनी उपस्थित केला. महिलांसाठी सातत्याने काम केल्याचा उल्लेख करत त्या म्हणाल्या, लाडकी बहीण योजनेअंतर्गत साडेअकराशेहून अधिक महिलांचे मोफत अर्ज भरून दिले. भाजपच्या बॅनरखाली गौरी-गणपती स्पर्धा, रामनवमी उत्सव, चित्रकला स्पर्धा सातत्याने घेतल्या. चित्रकला स्पर्धेत ९०० ते एक हजार विद्यार्थी सहभागी होत असून रामनवमीला साडेतीन ते चार हजार नागरिकांचा मोठा कार्यक्रम आम्ही उभा केला.

शिंदवणे परिसरातील महिलांची परिस्थिती मांडताना त्यांनी सांगितले की, या भागातील बहुतांश महिला शेतीवर अवलंबून



आहेत. सकाळी दहा ते संध्याकाळी सहा शेतात राबणाऱ्या महिलांना घरबसल्या रोजगार, पाण्याचा प्रश्न, वीजपुरवठा, आरोग्य सुविधा यांची गरज आहे. महिलांचे हॉस्पिटलचे प्रश्न असोत, पोलीस चौकीचे विषय असोत किंवा घरगुती वाद मी नेहमीच त्यांच्या पाठीशी उभी राहिले आहे.

मी आज तुमच्यासमोर एक उमेदवार म्हणून नाही, तर तुमची लेक म्हणून उभी आहे, असे भावनिक आवाहन करत पूजा सणस म्हणाल्या, पंचायत समितीमध्ये निवडून आल्यास शिंदवणे, तरडे, सोरतापवाडी आणि उरुळी कांचन येथील महिलांचे बचत गट वाढवणे, त्यांना कर्ज व लघुउद्योगासाठी मदत करणे, सरकारी शाळांचा दर्जा सुधारणे आणि विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधा पोहोचवणे, यासाठी शंभर टक्के प्रयत्न करेन.

दरम्यान, शेवटी त्यांनी मतदारांना थेट साद घालत म्हटले, या निवडणुकीत माझे चिन्ह बॅट आहे. या चिन्हासमोरील बटन दाबून तुमच्या या लाडक्या लेकीला बहुमताने निवडून द्या. माझा विजय तुमच्याच हातात आहे. या प्रकरणामुळे पक्षांतर्गत निर्णयप्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, एका हट्टासाठी कार्यकर्तीचा संघर्ष डावलल्याची चर्चा मतदारसंघात जोर धरू लागली आहे.

## राष्ट्रवादीच्या बालेकिल्ल्यात टिळेकरवाडीतील विद्यमान सरपंचांसह अनेकांचा भाजपात प्रवेश

**उरुळी कांचन, ता. ५ :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या रणधुमाळीतच पूर्व हवेलीतील राष्ट्रवादीचा बालेकिल्ला समजल्या जाणाऱ्या टिळेकरवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायतीवर भाजपचा भगवा फडकला आहे. विधान परिषदेचे आमदार योगेश टिळेकर यांच्या उपस्थितीत विद्यमान सरपंच गोवर्धन सुरेश टिळेकर यांनी आपल्या असंख्य कार्यकर्त्यांसह भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश करून राजकीय समीकरणे बदलून टाकली आहेत.

पुणे जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या प्रचारासाठी आमदार योगेशआण्णा टिळेकर टिळेकरवाडीत आले असताना हा ऐतिहासिक पक्षप्रवेश झाला. या वेळी सामाजिक कार्यकर्ते महेश टिळेकर, उद्योजक कपील टिळेकर, प्रतीक भुजबळ, अंकुश बाप्पु



टिळेकर यांच्यासह अनेक प्रमुख कार्यकर्त्यांनी भाजपची वाट धरली.

या कार्यक्रमास केसनंद-कोरेगाव मूळ जिल्हा परिषद गटाच्या उमेदवार कविता पायगुडे, पंचायत समिती गणाचे उमेदवार सुरज चौधरी, टिळेकरवाडीचे ज्येष्ठ नेते राजेंद्रजी टिळेकर, श्रीदत्त सेवा ट्रस्टचे अध्यक्ष संतोष बापू टिळेकर, सदाशिव टिळेकर, रोहिदास टिळेकर, शामभाऊ गावडे, सुभाष टिळेकर, सुभाष लोणकर, संगीता ताई टिळेकर, विजय टिळेकर, सोनल कोद्रे, गणेश टिळेकर, विकास जगताप, अमर टिळेकर, विकास टिळेकर, शामजी टिळेकर, चंद्रकांत टिळेकर, नितीन हगवणे, राजेंद्र चौधरी यांच्यासह टिळेकरवाडी, नायगाव व पेठ कोरेगाव मूळ येथील असंख्य ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार योगेश टिळेकर म्हणाले, टिळेकरवाडीचा भाजपमध्ये झालेला प्रवेश हा विकास, विश्वास आणि परिवर्तनाचा स्पष्ट संदेश आहे. भाजप सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी आणि गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे.

## भाजपच्या तिन्ही उमेदवारांना निवडून द्या : माजी उपसभापती सनी उर्फ युगंधर काळभोर

**लोणी काळभोर, ता. ५ :** सन २०१७ मध्ये जनतेने दिलेल्या विश्वासाचे सोने करत लोणी काळभोर परिसरात शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा व मूलभूत सुविधांच्या माध्यमातून सर्वांगीण विकास घडवून आणला असून, हा विकास अधिक वेगाने पुढे न्यायचा असेल तर भाजपच्या तिन्ही उमेदवारांना निवडून देण्याचे आवाहन हवेली पंचायत समितीचे माजी उपसभापती सनी उर्फ युगंधर काळभोर यांनी केले.

कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील भाजप कार्यालयात गुरुवारी (ता. ५) आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी लोणी काळभोरचे माजी सरपंच भरत काळभोर, योगेश काळभोर, कदमवाकवस्तीचे माजी सरपंच



चित्तरंजन गायकवाड, गौरी गायकवाड, कमलेश काळभोर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

युगंधर काळभोर म्हणाले, सर्वप्रथम विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत शाळांना संरक्षण भिंती उभारल्या, ई-लर्निंगसाठी इलेक्ट्रिक संच उपलब्ध करून दिले तसेच शाळेची पटसंख्या वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न केले. लोणी काळभोरचे आरोग्य केंद्र आज महाराष्ट्रातील आदर्श केंद्र म्हणून ओळखले जाते. हे केंद्र अधिक सक्षम करण्यासाठी इमारतीवर पहिला मजला उभारण्यात आला.

रस्ते व पथदिव्यांसह समाजमंदिर, महादेव मंदिर, लक्ष्मी आई मंदिर, सभामंडप तसेच मुस्लिम समाजातील मौलानांसाठी निवासाची सुविधा उपलब्ध करून देत सर्व धर्म समभाव या भावनेतून विकासकामे करण्यात आली. कोरोना काळात जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या माध्यमातून एक हजारहून अधिक रुग्णांना मोफत उपचार मिळवून देण्यात आले.

रायवाडी परिसरातील तीव्र पाणीटंचाई दूर करण्यासाठी दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर करून पाण्याच्या टाकीचे काम सुरू करण्यात आले असून, याचा फायदा तरवडी, पांढरी व परिसरातील शेकडो कुटुंबांना होणार आहे. लवकरच नागरिकांना घरपोच पाणी मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विकास केवळ घोषणा नसून प्रत्यक्ष कामातून दाखवला आहे. हा विकास अखंड सुरू ठेवायचा असेल तर भाजपकडून जिल्हा परिषद गटासाठी पूनम गायकवाड, कदमवाकवस्ती पंचायत समिती गणासाठी ज्ञानेश्वर नामुगडे आणि लोणी काळभोर-वडकी गणासाठी रेश्मा काळभोर या तिन्ही उमेदवारांना भरघोस मतांनी निवडून द्यावे, असे आवाहन युगंधर काळभोर यांनी केले.

यावेळी माजी सरपंच भरत काळभोर यांनीही विकासकामांचा आढावा घेतला. वाड्या-वस्त्यांवर जाणाऱ्या वन विभागाच्या हद्दीतील रस्त्यांना आवश्यक परवानग्या मिळवून सिमेंट काँक्रीटचे रस्ते प्रत्यक्षात आणले असून उर्वरित कामेही लवकर पूर्ण केली जातील, असे त्यांनी सांगितले.

पुणे-सोलापूर महामार्ग व लोणी गावादरम्यान होणारी वाहतूक कोंडी लक्षात घेऊन मंत्री रविंद्र चव्हाण यांच्या माध्यमातून सार्वजनिक बांधकाम विभागाची जागा उपलब्ध करून देत नवीन पोलीस ठाण्यासाठी १३ कोटी ९ लाख रुपयांचा निधी मंजूर करून घेण्यात आला. या पोलीस ठाण्याचे भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते झाले असून त्यामुळे परिसराच्या सुरक्षिततेला मोठा हातभार लागणार आहे.

## संक्षिप्त

### भिगवण शेटफळगडे जिल्हा परिषद गटात प्रचार अंतिम टप्प्यात

**भिगवण, ता. ५ :** भिगवणशेटफळगडे जिल्हा परिषद गटातील निवडणूक प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला असून सर्वच उमेदवारांनी प्रचाराला वेग दिला आहे. प्रमुख राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारही मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी विविध माध्यमांतून प्रयत्न करताना दिसत आहेत. या गटातून अपक्ष उमेदवार सोनाली बंडगर यांनी घराघरांत जाऊन मतदारांशी संवाद साधण्यावर भर दिला आहे. त्यांच्या प्रचारात पाणीपुरवठा, रस्ते, आरोग्य सुविधा, महिला सक्षमीकरण तसेच युवकांसाठी रोजगाराच्या संधी यांसारखे स्थानिक प्रश्न मांडले जात आहेत. त्यांच्या कपबशी या निवडणूक चिन्हाची ओळखही गावोगावी पोहोचत आहे. दरम्यान, विविध गावांत सभा, प्रचार फेऱ्या, भेटीगाठी सुरू असून मतदारांमध्ये निवडणुकीबाबत चर्चा होत आहे. महिला, युवक व शेतकरी वर्गाकडून उमेदवारांना प्रश्न विचारले जात असून स्थानिक विकासाच्या मुद्द्यांवर भर दिला जात आहे. या गटात प्रस्थापित पक्षांचे उमेदवार तसेच अपक्ष उमेदवार असल्याने लढत बहुरंगी ठरण्याची शक्यता आहे. प्रत्येक उमेदवार आपापल्या पद्धतीने मतदारांशी संपर्क साधत असून प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात वातावरण तापताना दिसत आहे. निवडणुकीत कोण बाजी मारणार, हे मतदानानंतर स्पष्ट होणार असले तरी सध्या भिगवणशेटफळगडे परिसरात प्रचाराची धामधूम सुरू आहे.

### पहाटे गारवा, दुपारी घाम! पुण्याच्या हवामानात मोठा उलटफेर वाढ

**पुणे, ता. ५ :** पुणे शहरात आज ५ फेब्रुवारी २०२६ रोजी हवामानात मोठे चढ-उतार पाहायला मिळत असून, थंडीचा कडाका कमी होऊन उन्हाचा तडाखा वाढल्याचे चित्र आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आज पुण्यात आकाश प्रामुख्याने निरभ्र राहील. फेब्रुवारी महिन्याच्या सुरुवातीलाच वातावरणात हा बदल जाणवू लागला असून, हिवाळ्याच्या निरोपाची चाहूल लागली आहे. तापमानाचा विचार करता, आज पुण्याचे कमाल तापमान साधारणपणे ३१ ते ३३ अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची शक्यता आहे, तर किमान तापमान १९ ते २० अंश सेल्सिअसच्या आसपास नोंदवले गेले आहे. पहाटेच्या वेळी हवेत थोडासा गारवा जाणवत असला, तरी सूर्योदय होताच तापमानात झपाट्याने वाढ होत आहे. दुपारच्या वेळी उन्हाची तीव्रता अधिक असल्याने वातावरणात काहीसा उकाडा जाणवत आहे. हवामान तज्ज्ञांच्या मते, अरबी समुद्रावरून येणाऱ्या बाष्पयुक्त वाऱ्यांमुळे वातावरणात हा बदल झाला आहे. गेल्या काही दिवसांत जाणवलेला ढगाळ हवामानाचा प्रभाव आता कमी झाला असून, पावसाची शक्यता पूर्णपणे मावळली आहे. पुणे आणि आसपासच्या परिसरात कोरडे हवामान राहणार असून, आर्द्रतेचे प्रमाण ३५ ते ४० टक्क्यांच्या दरम्यान राहील, ज्यामुळे दुपारी हवा अधिक कोरडी जाणवेल.

### गंजपेठ येथे २३ वर्षीय विवाहितेचा खून

**पुणे, ता. ५ :** गंजपेठ परिसरातील एका २३ वर्षीय विवाहितेचा संशयास्पद मृत्यू हा अपघात नसून, तो थंड डोक्याने केलेला खून असल्याचे खडक पोलिसांनी उघडकीस आणले आहे. पत्नी घरात पाय घसरून पडली आणि त्यातच तिचा जीव गेला, असा कांगावा करत या गुन्ह्यावर पांघरुण घालण्याचा प्रयत्न करणाऱ्या पतीसह तिघांच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या आहेत. वैष्णवी ऊर्फ वर्षा तुषार तुपसौंदर्य या तरुणीचा मृत्यू झाला तेव्हा सासरच्या मंडळींनी हा एक दुर्दैवी अपघात असल्याचे भासवले होते. मात्र, पोलिसांना काही गोष्टी खटकल्या. वैष्णवीच्या शरीरावरील जखमांच्या खुणा आणि सासरच्या लोकांच्या विधानांमुळे संशयाची सुई पती तुषारकडे वळली. आरोपी तुषारने पुरावे नष्ट करण्यासाठी आणि पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी 'पाय घसरून पडल्याचा' बनाव रचला होता.सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिता लतोंडे आणि त्यांच्या पथकाने केवळ तोंडी जबाबावर विसंबून न राहता तांत्रिक पुराव्यांचा आधार घेतला. शवविच्छेदन अहवाल आल्यानंतर पोलिसांचा संशय खरा ठरला. वैष्णवीचा मृत्यू कोणत्याही अपघातामुळे नाही, तर तिचा गळा दाबून किंवा मारहाण करून खून केल्याचे स्पष्ट झाले. खडक पोलिसांनी याप्रकरणी पतीसह आणखी दोन आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

### पुण्यात तरुणांकडून ऊसतोडणीचे काम नाकारल्याने मारहाण

**पुणे, ता. ५ :** पुण्यातून कामाच्या आमिषाने एका तरुणाला फसवून थेट ऊसतोडणीसाठी डांबून ठेवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. हा तरुण डिलिव्हरी बॉय म्हणून काम करत असून, रोजगाराच्या शोधात असताना मानवी तस्करीसारख्या जाळ्यात अडकला. फिर्यादी तरुण २३ डिसेंबरच्या रात्री उशिरा अरोरा टॉवर परिसरात डिलिव्हरी करून पुणे रेल्वे स्टेशन परिसरात झोपला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी उठल्यानंतर त्याचा मोबाईल चोरीला गेल्याचे लक्षात आले. दिवसभर स्टेशन परिसरात भटकंती केल्यानंतर रात्री एका अनोळखी व्यक्तीने त्याला कामाची विचारणा केली. पुण्याजवळ शेतात काम असून रोज १००० रुपये मजुरी मिळेल, असे सांगत विश्वास संपादन करण्यात आला. त्या रात्री सुमारे ११ वाजता पुणे स्टेशनवरून त्याला आणखी काही तरुणांसह कारमध्ये बसवण्यात आले. पहाटे ३ वाजता सोलापूर जिल्ह्यात एका ठिकाणी उतरवून पुढे मालवाहू वाहनातून म्हाडा परिसरात एका खोलीत ठेवण्यात आले. येथे अप्पा तांबे यांच्या मार्फत त्याच्याकडून ऊसतोडणीचे काम जबरदस्तीने करून घेतले जात होते. ऊसतोडणीचे काम अत्यंत कष्टाचे असताना पहाटे ४ वाजता उठवून रात्री १० वाजेपर्यंत काम करण्यास भाग पाडले जात होते. काम नाकारल्यास केबल वायर आणि बांबूने मारहाण केली जात होती.

# उरुळी कांचनमधून भाजपचे तिन्ही उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येणार

## सारिका लोणारी यांचा ठाम विश्वास

**लोणी काळभोर, ता. ५ :** उरुळी कांचन जिल्हा परिषद गट तसेच सोरतापवाडी व उरुळी कांचन पंचायत समिती गणातील निवडणूक प्रचाराने सध्या चांगलाच वेग घेतला असून भारतीय जनता पक्षाने या मतदारसंघात निर्णायक आघाडी घेतली आहे. गावोगावी, वाड्या-वस्त्यांवर सुरु असलेल्या प्रचाराला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळत असून विकासकामांच्या जोरावर भाजपचे तिन्ही उमेदवार मोठ्या मताधिक्याने निवडून येतील, असा ठाम विश्वास भाजपच्या उमेदवार सारिका लोणारी यांनी व्यक्त केला आहे.

उरुळी कांचन परिसरात गेल्या काही वर्षांत रस्ते, पाणीपुरवठा, वीज, स्वच्छता, महिला व युवकांसाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या आहेत. या विकासकामांचा थेट फायदा सामान्य नागरिकांना झाल्याने भाजपविषयी सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. विकास हाच आमचा अजेंडा असून त्याच जोरावर आम्ही मतदारांपर्यंत पोहोचलो आहोत, असे सारिका लोणारी यांनी सांगितले. दहा वर्षे उरुळी कांचन ग्रामपंचायतीच्या सदस्य म्हणून जबाबदारीने कामकाज केले आहे. नागरिकांच्या दैनंदिन समस्या, पाणी, रस्ते, आरोग्य, स्वच्छता यांसारख्या प्रश्नांना नेहमीच प्राधान्य दिले आहे. विविध सामाजिक



उपक्रमांच्या माध्यमातून जनतेशी घट्ट नाळ जोडली असून १०० काम करणारी महिला अशी माझी ओळख निर्माण झाली आहे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी विशेष प्रयत्न केले असून २ ते ३ हजार लाडक्या बहिणींना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून दिला आहे. असे सारिका लोणारी यांनी सांगताना नमूद केले आहे.

या गटातील भाजपचे उमेदवार शंकर बडेकर हे विद्यमान सदस्य असून त्यांनी आपल्या कार्यकाळात समाजाच्या हितासाठी अनेक महत्त्वपूर्ण कामे केली आहेत. त्यांच्या कामाची पोचपावती म्हणजे नागरिकांमध्ये त्यांच्याविषयी असलेला विश्वास व सकारात्मक दृष्टिकोन. विकास कामांसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख आहे.तर तिसरे उमेदवार सुदर्शन चौधरी यांना समाजसेवेची बाळकडू लहानपणापासूनच मिळाली आहे. सामाजिक उपक्रम, युवकांचे प्रश्न, गावाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेले काम सर्वपरिचित आहे. तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचून काम करण्याची त्यांची कार्यपद्धती मतदारांना भावत आहे.

उरुळी कांचनमधील जनता विकासाच्या पाठीशी ठामपणे उभी आहे. त्यामुळे माझ्यासह भाजपचे तिन्ही उमेदवार १०० टक्के मोठ्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास व्यक्त करत सारिका लोणारी यांनी विजयाचा निर्धार व्यक्त केला आहे.

### खेड तालुक्यात गैरसमजातून तरुणाला बेदम मारहाण

**पुणे, ता. ५ :** कौटुंबिक वादातून निर्माण झालेला एक गैरसमज खेड तालुक्यातील हेद्रुज गावात हिंसक वळणाला गेल्याची घटना समोर आली आहे. वडिलांना शिवीगाळ होत असल्याचा समज झाल्याने जाब विचारण्यासाठी गेलेल्या एका तरुणाला लाकडी दांडक्याने आणि लोखंडी गजाने बेदम मारहाण करण्यात आली. या प्रकरणी महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात चौघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेत अमोल बबन बच्चे (वय ३३) हे जखमी झाले असून त्यांनी पोलिसांकडे तक्रार दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना सोमवार, २ फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे ९ वाजण्याच्या सुमारास घडली. अमोल यांचे वडील घरात कौटुंबिक कारणावरून त्यांच्या पत्नीशी बोलत असताना शिवीगाळ करत होते. मात्र, शेजारील नातेवाईकांना असा गैरसमज झाला की ही शिवीगाळ आपल्यालाच उद्देशून केली जात आहे. या गैरसमजातून वाद निर्माण झाला.

## भाजपच्या उमेदवार पूनम गायकवाडवर गुन्हा दाखल

**लोणी काळभोर, ता. ५ :** जिल्हा परिषद निवडणुकीच्या ऐन तोंडावर लोणी काळभोर गटातील भाजपच्या अधिकृत उमेदवार पूनम बाबुराव गायकवाड यांच्यावर द्विभार्या कायद्यासह मानसिक छळ, बदनामी व आर्थिक फसवणुकीचे गंभीर आरोप ठेवत गुन्हा दाखल करण्यात आल्याने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

या प्रकरणात सिद्धेश्वर नामदेव काळभोर, कथित पत्नी पूनम गायकवाड, दीर नवनाथ काळभोर, जाऊ स्नेहल काळभोर, मावशी नंदा बोत्रे, निर्मला चौधरी, मामा दत्तात्रय भाडळे, वृषाली बोत्रे व प्रणाली बोत्रे अशा नऊ जणांविरोधात लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा




नोंदविण्यात आला आहे.

एका महिला पोलिसाने दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, पीडिता व सिद्धेश्वर काळभोर हे कायदेशीर पती-पत्नी असून दोघांमध्ये घटस्फोट झालेला नाही. असे असतानाही सिद्धेश्वर काळभोर यांनी पूनम गायकवाड यांना पत्नी म्हणून दर्शवत सोशल मीडियावर स्टेटस व्हायरल केल्याचा आरोप आहे. यामुळे पीडितेची समाजात बदनामी झाल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

तसेच २३ जून २०२० रोजी पूनम गायकवाड यांनी पीडितेला मोबाईलवरून धमकी दिल्याचा आरोप असून, व्यवसायात गुंतवलेली रक्कमही परत न दिल्याचा दावा करण्यात आला आहे. निवडणूक काळात उमेदवाराला विरोध करू नये म्हणून दीर नवनाथ काळभोर यांनी पीडितेवर दबाव टाकल्याचेही तक्रारीत स्पष्ट करण्यात आले आहे.

या सर्व आरोपींवर भारतीय न्याय संहिता कलम ७९, ८२(१), ८५, ३५१(३), ३५६ तसेच माहिती तंत्रज्ञान कायदा कलम ६७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील करत आहेत.

दरम्यान, निवडणूक प्रचार शिगेला पोहोचलेला असताना भाजप उमेदवारावर अशा स्वरूपाचा गंभीर गुन्हा दाखल झाल्याने संपूर्ण गटात चर्चेला उधाण आले असून, या प्रकरणाचा निवडणूक निकालावर काय परिणाम होतो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### पुण्यात भररस्त्यात एका तरुणावर कोयत्याने सपासप वार

**पुणे, ता. ५ :** पुणे शहरात पुन्हा एकदा गंभीर स्वरूपाची हिंसक घटना समोर आली आहे. किरकोळ कारणावरून तरुणांमध्ये होणारे वाद थेट जीवघेण्या हल्ल्यांपर्यंत जात असल्याचे चित्र दिसत आहे. धनकवडी परिसरातील त्रिमूर्ती चौकात मंगळवारी रात्री एका तरुणावर त्याच्याच मित्राने कोयत्याने हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली. केवळ एका संशयातून हा प्रकार घडल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या घटनेत आदित्य सुनील कांबळे (वय २०, रा. नऱ्हे) हा गंभीर जखमी झाला असून चेतन बाजीराव चव्हाण (वय २३, रा. धनकवडी) याने त्याच्यावर हल्ला केल्याचा आरोप आहे. आदित्य आणि चेतन हे दोघेही मित्र होते. दोघांचीही एकाच तरुणीशी ओळख होती. मंगळवारी रात्री ते दोघे धनकवडीतील त्रिमूर्ती चौकात भेटले होते. सुरुवातीला साध्या गप्पा सुरू होत्या. मात्र आदित्यने त्या तरुणीशी मोबाईलवर बोलल्याची माहिती चेतनला मिळाल्यानंतर त्याचा राग अनावर झाला.

रागाच्या भरात चेतनने अचानक कोयता काढून आदित्यवर सपासप वार केले. गजबजलेल्या चौकात आणि रात्रीच्या वेळेतही हा हल्ला झाल्याने नागरिकांमध्ये घबराट पसरली. या हल्ल्यात आदित्य गंभीर जखमी होऊन रस्त्यावर कोसळला. काही वेळातच परिसरात मोठी गर्दी जमली. जखमी अवस्थेत आदित्यला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. घटनेची माहिती मिळताच भारती विद्यापीठ पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी आरोपी चेतन चव्हाण याला अटक केली असून आदित्यच्या फिर्यादीवरून खुनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पार्थ पवारांना क्लीन चिट; मग १८०० कोटींचा मुंढवा जमीन घोटाळा केला कोणी?

**पुणे, ता. ५ :** पुण्यातील मुंढवा जमीन घोटाळा प्रकरणात राजकीय वर्तुळातून एक मोठी बातमी समोर येत आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांना या प्रकरणात राज्य सरकारने नियुक्त केलेल्या विकास खारगे समितीने मोठा दिलासा दिला आहे. पुण्यातील मुंढवा परिसरातील जमिनीच्या व्यवहारात मोठ्या प्रमाणावर अनियमितता आणि मुद्रांक शुल्काची चोरी झाल्याचे आरोप झाले होते. याप्रकरणी सुमारे १०० पानांच्या सविस्तर अहवालात पार्थ पवारांच्या नावाचा साधा उल्लेखही नाही.



या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता, महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय चौकशी समिती नेमण्यात आली होती. या समितीने जमिनीच्या खरेदी-विक्रीची प्रक्रिया, स्वाक्षऱ्या आणि आर्थिक व्यवहारांची बारकाईने तपासणी केली.

तपास समितीने दिलेल्या माहितीनुसार, या संपूर्ण व्यवहाराच्या अधिकृत कागदपत्रांवर कुठेही पार्थ पवार यांची सही आढळलेली नाही. तांत्रिकदृष्ट्या आणि प्रत्यक्ष पुराव्यांच्या अभावी त्यांचा या प्रक्रियेत थेट सहभाग असल्याचे सिद्ध होऊ शकलेले नाही. यापूर्वी पोलिसांनी दाखल केलेल्या आरोपपत्रातही त्यांच्यावर ठपका ठेवला नव्हता, आता खारगे समितीच्या अहवालाने त्यावर शिक्कामोर्तब केले आहे.

मुंढवा जमीन घोटाळ्यात स्वाक्षरी नसल्याने पार्थ पवारांना दिलासा मिळाला असला, तरी सहसंचालक दिग्विजय पाटील आणि शीतल तेजवानी अडचणीत आले आहेत. तांत्रिक पुरावे मिळाल्याने त्यांना दोषी धरले असून, या प्रकरणातील २१ कोटींच्या वसुलीमुळे कंपनीवर मोठी टांगती तलवार आहे.

## लोणी काळभोर पोलिसांनी दोन अट्टल दुचाकी चोरट्यांना ठोकल्या बेड्या

**लोणी काळभोर, ता. ४ :** पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरून चोरलेल्या दुचाकी घेऊन चाललेल्या दोन अट्टल चोरट्यांना लोणी काळभोर पोलिसांनी अटक केली आहे. राज बाळू घाडगे (वय २३, रा. मांजरी, ता. हवेली), किशोर संजू चाटे (वय २३, मुंढवा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे गुन्हे शाखेचे पथक पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पुणे सोलापूर महामार्गावर नाकाबंदी करत होते. यावेळी पोलिसांना बिना नंबर प्लेटच्या दोन दुचाकी गाड्या आढळून आल्या. पोलिसांनी दोघांना ताब्यात घेऊन अधिक चौकशी केली असता, चोरट्यांनी खराडी आणि लोणीकंद पोलिस ठाण्याच्या हद्दीतून दुचाकी चोरल्याची



कबुली पोलिसांना दिली आहे. पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली आहे. तर त्यांच्याकडून दोन दुचाकी जप्त केल्या आहेत.

ही कामगिरी पुणे शहर पोलीस उपआयुक्त डॉक्टर राजकुमार शिंदे, सहायक पोलीस आयुक्त अनुराधा उदमले, लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे,पोलीस निरीक्षक (गुन्हे) स्मिता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर पोलीस हवालदार अण्णा माने, पोलिस अंमलदार सचिन सोनवणे, राहुल कर्डिले, सुरज कुंभार, प्रवीण धडस, प्रशांत सुतार, अशोक गिरी व त्यांच्या सहकाऱ्यांनी कामगिरी केली आहे.

## अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून सक्तीने धर्मांतर व विवाह

**सोलापूर, ता. ५ :** शहरातील विजापूर नाका पोलीस ठाण्याच्या हद्दीत माणुसकीला काळीमा फासणारी एक संतापजनक घटना उघडकीस आली आहे. एका अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून, तिला ब्लॅकमेल करत तिच्यावर बलात्कार करण्यात आला आणि त्यानंतर तिचे सक्तीने धर्मांतर करून लग्न लावण्यात आले. या प्रकरणी पोलिसांनी एका वकिलासह तिघांना अटक केली असून, दोन आरोपी अद्याप फरार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, याप्रकरणी आरोपी इजराईल शेख, त्याचा सहकारी मित्र उजेब शेख, ॲड. अब्दुल्ला खतीब यांना अटक करण्यात आली आहे. मुख्य आरोपी इजराईल शेख हा पीडित अल्पवयीन मुलीचा गेल्या अनेक दिवसांपासून पाठलाग करत होता. डिसेंबर २०२४ मध्ये त्याने पीडितेचे खासगी फोटो



आणि व्हिडिओ मिळवून तिला ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. त्यानंतर त्याने आपला मित्र उजेब शेख याच्या घरी नेऊन पीडितेवर अत्याचार केले.

अत्याचाराची ही मालिका एवढ्यावरच थांबली नाही. डिसेंबर २०२५ मध्ये आरोपीने पीडितेवर लग्नाचे दडपण आणले आणि तिला शहर काझी कार्यालयात नेले. तेथे ॲड. अब्दुल्ला खतीब याने विवाहासाठी धर्मांतर आवश्यक आहे असे सांगून पीडितेकडून काही कागदपत्रांवर जबरदस्तीने स्वाक्षऱ्या घेतल्या आणि तिचे धर्मांतर करून निकाह लावला.

विवाहानंतर पीडितेला कर्नाटकातील कलबुर्गी येथे नेण्यात आले. तिथेही तिचे हाल संपले नाहीत. आरोपीचे नातेवाईकांनी तिला मारहाण केली आणि उपाशी ठेवून तिचा शारीरिक व मानसिक छळ केल्याचे पीडितेने आपल्या तक्रारीत नमूद केले आहे.

पीडितेने सोलापूर गाठून विजापूर नाका पोलीस ठाण्यात धाव घेत आपबिती सांगितली. पोलिसांनी या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तातडीने गुन्हा दाखल केला आहे. आरोपी इजराईल शेख, त्याचा सहकारी मित्र उजेब शेख, ॲड. अब्दुल्ला खतीब यांना अटक करण्यात आली आहे.

या गुन्ह्यातील अन्य दोन आरोपी सध्या फरार असून पोलीस त्यांचा कसून शोध घेत आहेत. या घटनेमुळे सोलापूर शहरात तीव्र संताप व्यक्त होत असून, आरोपींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

## घड्याळावरची निष्ठा म्हणजे विकासावरची मोहोर : माजी पंचायत समिती सदस्य बाळसाहेब चौधरी

**उरुळी कांचन, ता. ५ :** घड्याळावरचे प्रत्येक मत म्हणजे विकासावरचा शिक्का आहे. हीच माननीय अजितदादांच्या विचारांना खरी श्रद्धांजली ठरेल, असा आक्रमक आणि ठाम विश्वास असल्याचे प्रतिपादन पंचायत समितीचे माजी सदस्य बाळासाहेब चौधरी यांनी केले.

राजकारणात शब्दांपेक्षा काम बोलते, आणि कामातूनच नेतृत्व घडते, हे गेल्या चार दशकांपासून स्व. हनुमंत चौधरी यांच्या कुटुंबाने सिद्ध करून दाखवले. थेऊर येथील यशवंत सहकारी साखर कारखान्याचे संचालक, सोळा वर्षे चिंतामणी प्रासादिक दिंडीचे अध्यक्षपद भूषवणारे आणि सामाजिक, धार्मिक व विकासात्मक कार्यात सातत्याने अग्रेसर असलेले चौधरी कुटुंब म्हणजे परिसराच्या विकासाचा कणा ठरले आहे.

माननीयनामदारअजितदादा पवार यांच्या विचारांशी आणि नेतृत्वाशी गेली ४० वर्षे घट्ट नाळ जोडून या कुटुंबाने विकासाची मशाल अखंड पेटती ठेवली आहे. नायगाव, पेठ, प्रयागधामसह संपूर्ण परिसरात शाळा खोल्या, दर्जेदार रस्ते, पाणीपुरवठा योजना, अंगणवाड्या यांसारख्या मूलभूत सुविधा उभ्या राहिल्या, त्या केवळ आश्वासनांमुळे नव्हे, तर प्रत्यक्ष कृतीमुळे झाल्या आहेत.



ज्यांच्या डोक्यावर छप्पर नव्हते अशा सुमारे २०० कुटुंबांना नायगाव परिसरात घरे मिळवून देण्याचे ऐतिहासिक काम स्व. बंधू हनुमंत चौधरी यांनी करून दाखवले. पंचायत समितीच्या माध्यमातून राबवलेल्या योजनांनी गावागावात विकास पोहोचवला. या कुटुंबाची ओळख केवळ पदांपुरती मर्यादित राहिलेली नाही. सुख-दुःखात नागरिकांसोबत उभे राहणे, अडचणीच्या काळात मदतीसाठी धावून जाणे आणि शेवटपर्यंत साथ देणे, हीच त्यांची खरी राजकीय संस्कृती आहे. त्यामुळेच प्रत्येक घराशी, प्रत्येक कुटुंबाशी या चौधरी कुटुंबाची भावनिक नाळ घट्ट जोडलेली आहे.

आज अजितदादा प्रत्यक्ष नसले, तरी त्यांच्या विचारांची, निर्णयक्षम नेतृत्वाची आणि विकासदृष्टीची ताकद या कुटुंबामागे भक्कमपणे उभी आहे. अण्णांच्या आकस्मिक जाण्यानंतरही अजितदादांनी या कुटुंबावर टाकलेला विश्वास आणि दिलेली जबाबदारी आजही विकासकामांच्या रूपाने स्पष्टपणे दिसून येत आहे.

दरम्यान, पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कोरेगाव मूळ जिल्हा परिषद गटातून सुरेखा हरगुडे, कोरेगाव मूळ गणातून कृषिराज चौधरी, तर केसनंद गणातून प्रमोद हरगुडे राष्ट्रवादीकडून रिंगणात उतरले असून, विकासाची गती अधिक वेगाने वाढवण्याचा ठाम निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही भूलथापा, अफवा किंवा फसव्या राजकारणाला बळी न पडता, घड्याळाच्या चिन्हासमोरचे बटन दाबून राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना प्रचंड बहुमतांनी निवडून द्यावे.

# राज्याचे माजी अर्थमंत्री जयंत पाटील भाजपमध्ये जाणार : सदाभाऊ खोत



**पुणे, ता. ५ :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) मधील ज्येष्ठ नेते आणि राज्याचे माजी अर्थमंत्री जयंत पाटील भाजपमध्ये जाणार असल्याचा दावा सत्ताधारी आमदार सदाभाऊ खोत यांनी केल्यानंतर सांगलीच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. एकीकडे दोन्ही राष्ट्रवादी गटांच्या संभाव्य विलिनीकरणावर चर्चा सुरू असताना, दुसरीकडे जयंत पाटील थेट भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याचे वक्तव्य आल्याने राजकीय वर्तुळात तर्कवितर्कांना उधाण आले.

सदाभाऊ खोत यांनी सांगलीत बोलताना आता काटा उलटा फिरायला लागलाय, जयंत पाटील फार दिवस तिकडे बसणार नाहीत. थोड्याच दिवसांत ते भाजपमध्ये येतील, असा दावा केला होता. यावर जयंत पाटील यांनी त्वरित आणि तीव्र प्रतिक्रिया देत हा दावा साफ फेटाळून लावला.

जयंत पाटील म्हणाले, दहा पक्ष बदलून हा बाबा तिकडे गेला आहे आणि आता मला भाजपमध्ये जाणार म्हणतोय. हा विनोद नाही तर काय? अशा शब्दांत त्यांनी सदाभाऊ खोत यांचा खरपूस समाचार घेतला. त्यांनी अप्रत्यक्षपणे खोत यांच्या राजकीय प्रवासावरही टीका करत, सत्तेशिवाय काही लोकांना राजकारण करता येत नाही, असा टोला लगावला.

ही वाक्ययुद्धाची ठिणगी सांगलीतील वाळवा येथे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत झालेल्या शिवसेनाम हायुतीच्या जिल्हा परिषद निवडणूक प्रचार सभेतून उडाली. त्या सभेत सदाभाऊ खोत यांनी जयंत पाटील यांच्यावर नाव न घेता टीका केली होती.

दरम्यान, जयंत पाटील यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, भाजपम ध्ये जाण्याचा कोणताही प्रश्न नाही. त्यामुळे हा दावा राजकीय अफवा आणि दबावाच्या राजकारणाचा भाग असल्याचे मानले जात आहे. सांगलीच्या राजकारणात आधीच असलेली धुसफुस आता उघडपणे समोर येताना दिसत असून, आगामी काळात ही जुंपली आणखी तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# उरुळी कांचन–सोरतापवाडी गटात भाजपचा झेंडा फडकणार : सुदर्शन चौधरी

**उरुळी कांचन, ता. ५ :** उरुळी कांचन व सोरतापवाडी जिल्हा परिषद गटातील सर्वांगीण विकासासाठी भारतीय जनता पार्टी कटिबद्ध असून, हीच विकासाभिमुख भूमिका जनतेला भावत आहे. गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या प्रचारादरम्यान मि ळणारा नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद पाहता, पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीत भाजपच्या तिन्ही उमेदवारांचा विजय निश्चित असल्याचे ठाम मत कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक आणि भाजपचे पंचायत समितीचे अधिकृत उमेदवार सुदर्शन चौधरी यांनी केले. सोरतापवाडी (ता. हवेली) येथे पुणे प्राईम न्यूजशी बोलत होते.

सुदर्शन चौधरी म्हणाले की, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत अनेक महत्त्वाचे निर्णय बाजार समितीच्या माध्यामातून घेण्यात आले. त्यामुळे शेतमालाला योग्य दर, बाजारपेठेतील सुविधा, वाहतूक व साठवणुकीच्या अडचणी यावर प्रभावी उपाययोजना राबवण्यात आल्या. या कामांची थेट पावती शेतकरी आणि व्यापारी वर्गाकडून भारतीय जनता पार्टीच्या तिन्ही उमेदवारांना मिळत असून, त्यामुळेच भाजपवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.



उरुळी कांचन जिल्हा परिषद गटातून भाजपचे उमेदवार शंकर बडेकर हे विद्यमान सदस्य असून, त्यांच्या कार्यकाळात समाजातील सर्व घटकांसाठी भरीव व लोकाभिमुख विकासकामे करण्यात आली आहेत. रस्ते, पाणीपुरवठा, वीज, आरोग्य, शिक्षण आणि ग्रामीण पायाभूत सुविधा या सर्व क्षेत्रांत त्यांनी सातत्याने पाठपुरावा करून निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे सामान्य नागरिकांपासून शेतकरी, युवक व महिला वर्गापर्यंत सर्वच घटकांमध्ये त्यांना भक्कम पाठिंबा मिळत असल्याचे चित्र आहे.

उरुळी कांचन पंचायत समिती गणातून भाजपच्या उमेदवार सारिका लोणारी या निवडणुकीच्या मैदानात उतरल्या असून, त्यांना महिलांसह तरुण मतदारांचा उत्स्फुर्त पाठिंबा मि ळत आहे. जनतेशी थेट संवाद, प्रश्नांची तत्काळ दखल आणि विकासाभिमुख भूमिका यामुळे लोणारी यांच्या कार्यामुळे स्थानिक पातळीवर त्यांची जोरदार चर्चा सुरु आहे. मी स्वतः तसेच भाजपचे तिन्ही उमेदवार जनतेच्या हितासाठी प्रामाणिकपणे काम करत आलो आहोत. केवळ आश्वासनांवर नव्हे, तर प्रत्यक्ष कामावर विश्वास ठेवणारी जनता आज भाजपच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे.

चौधरी यापुढे बोलताना म्हणाले, उरुळी कांचन-सोरतापवाडी गणातील सोरतापवाडी, शिंदवणे, वळती, तरडे आणि उरुळी कांचन येथील ज्येष्ठ नागरिकांसाठी ज्येष्ठ नागरिकांचे गॅरंटी कार्ड ही अभिनव योजना राबवली जाणार आहे. मोफत आरोग्य तपासणी, औषधे व आवश्यक साहित्य यांचा यात समावेश असून, दर दोन वर्षांनी आरोग्य तपासणी बंधनकारक ठेवून वृद्धांच्या आरोग्याची जबाबदारी थेट प्रशासनावर टाकली जाणार आहे. फक्त फोटोसेशन करणाऱ्या योजनांचा नव्हे, तर प्रत्यक्ष दिलासा देणाऱ्या निर्णयांचा हा आराखडा आहे, असा टोला त्यांनी नाव न घेता विरोधकांना लगावला.

दरम्यान, उरुळी कांचन परिसरात भाजपच्या प्रचाराला दिवसेंदिवस वाढता प्रतिसाद मिळत असून, संघटनात्मक ताकद, विकासाची ठोस कामगिरी आणि जनतेशी असलेला विश्वासाचा संबंध यामुळे भाजपने निवडणूक रणधुमाळीत स्पष्ट आघाडी घेतली असल्याचे चौधरी यांनी यावेळी सांगीतले.

# विरोधक टॅक्स चोर गँग; जनतेच्या पैशांवर डल्ला मारणाऱ्यांना मतातून धडा शिकवा : चित्तरंजन गायकवाड

**लोणी काळभोर, ता. ५ :** विरोधकांकडून होत असलेले आरोप पूर्णतः बिनबुडाचे असून सन २०१७ पूर्वी सत्तेत असलेली माजी सरपंच टोळी ही टॅक्स चोर गँग असल्याचा सनसनाटी आरोप कदमवाकवस्तीचे माजी सरपंच चित्तरंजन गायकवाड यांनी केला. इंडियन ऑइल, एचपीसीएल, विशे, वेल्वेट यांसारख्या कंपन्यांच्या टेंडरमधून स्वतःचा फायदा करून घेत जनतेच्या पैशांवर डल्ला मारला असल्याचा घणाघातही त्यांनी केला.

कदमवाकवस्ती (ता. हवेली) येथील भाजप कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी हवेली पंचायत समितीचे माजी उपसभापती सनी उर्फ युगंधर काळभोर, लोणी काळभोरचे माजी सरपंच भरत काळभोर, योगेश काळभोर,



कदमवाकवस्तीच्या माजी सरपंच गौरी गायकवाड, कमलेश काळभोर यांच्यासह भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते व पत्रकार उपस्थित होते.

गायकवाड म्हणाले, आम्ही कर वाढवून नव्हे, तर नियोजनबद्ध महसूल वाढवून गावाचा सर्वांगीण विकास केला आहे. विकासकामांमुळेच जनतेने आम्हाला दोनदा संधी दिली. विरोधकांचा एकएक डाव कोसळत चालला आहे. म्हणूनच ते आरोप-प्रत्यारोप करत जनतेची दिशाभूल करत आहेत. रोखठोक चर्चेसाठी आम्ही तयार आहोत; मात्र ते समोर येण्याचे धाडस करत नाहीत. कुठेतरी दगड फेकून राजकारण करता येत नाही. त्यांची बुद्धी कचऱ्यात जमा झाली आहे. त्यामुळे जनता सुज्ञ आहे आणि लबाड लोकांना मतातून जागा दाखवेल. भाजपकडून लोणी काळभोर जिल्हा परिषद गटासाठी पूनम गायकवाड, कदमवाकवस्ती पंचायत समिती गणासाठी ज्ञानेश्वर नामुगडे आणि लोणी काळभोर-वडकी गणासाठी रेश्मा काळभोर हे उमेदवार रिंगणात उतरले असून, तिघांनाही विजयी करण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी माजी सरपंच गौरी गायकवाड म्हणाल्या, सन २०१२ मध्ये पंचायत समितीच्या माध्यमातून जनसेवेची संधी मिळाली. त्या संधीचे सोने करत जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या विविध योजना कदम वाकवस्तीमध्ये आणल्या. केलेल्या विकासकामांची पोचपावती म्हणून सन २०१७ मध्ये जनतेने मला प्रथम लोकनियुक्त सरपंच म्हणून पुन्हा संधी दिली. पाच वर्षांत दिव्यांगांसाठी मोठा निधी उपलब्ध करून देण्यात आला. ग्रामपंचायतीमार्फत पुनर्सर्वे क्षण करून उत्पन्न वाढविण्यात आले. कोरोना काळात लसीकरण केंद्र उभारले. सीएसआर फंड मिळविणारी कदमवाकवस्ती ग्रामपंचायत ही हवेली तालुक्यातील पहिली ग्राम पंचायत ठरली.

# पूर्व हवेलीत प्रचाराच्या रणधुमाळीला पूर्णविराम; प्रमुख पक्षांसह अपक्षांच्या तोफा थंडावल्या

**लोणी काळभोर, ता. ५ :** जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीसाठी पूर्व हवेली तालुक्यात गेले अनेक दिवस सुरू असलेली प्रचाराची रणधुमाळी अखेर गुरुवारी (ता. ५) सायंकाळी थांबली. प्रमुख राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारांनीही शेवटच्या टप्प्यात जोरदार शक्तिप्रदर्शन करत मतदारांपर्यंत पोहोचण्याचा आटोकाट प्रयत्न केला. प्रचार संपताच आता सर्वच उमेदवार व कार्यकर्ते निकालाच्या प्रतीक्षेत असून मतदारांमध्येही उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, बसपा, वंचित, रासपसह स्थानिक आघाड्या आणि अपक्ष उमेदवारांनी गावोगावी पदयात्रा, सभा, कोपरा बैठका, घराघरांत जाऊन संपर्क साधत मतदारांना आपल्या बाजूने वळवण्याचा प्रयत्न केला. शेवटच्या दिवशी प्रत्येक गटात रोड शो, फेरी, वाहन रॅली आणि प्रचार फेऱ्यांचा जोर दिसून आला. उमेदवारांनी विकासकामांचे दाखले देत पुढील पाच वर्षांचे व्हिजन मांडले, तर काही ठिकाणी आरोप-प्रत्यारोपांनाही उधाण आले.

पूर्व हवेलीतील लोणी काळभोर, कदमवाकवस्ती, वडकी, थेऊर, उरुळी कांचन, सोरतापवाडी, कोरेगाव मूळ सह परिसरात प्रचाराचा शेवटचा दिवस चांगलाच रंगला. नागरिकांच्या भेटीगाठी, हातमि ळवणी, आश्वासनांची सरबत्ती आणि मतदारांना भावनिक साद घालण्याचे प्रयत्न शेवटच्या क्षणापर्यंत सुरू होते. अनेक उमेदवारांनी मंदिरामध्ये जाऊन दर्शन घेत विजयासाठी प्रार्थनाही केली.

दरम्यान, प्रचाराच्या काळात पाणीपुरवठा, रस्ते, वीज, आरोग्य सुविधा, शाळा, ड्रेनेज, रोजगार यांसारख्या स्थानिक प्रश्नांवर भर देण्यात आला. काही ठिकाणी विकासकामांचा श्रेयवाद रंगला, तर काही गटांत नव्या चेहऱ्यांनी जुन्या समीकरणांना आव्हान दिले. अपक्ष उमेदवारांनीही स्थानिक माणूस हा मुद्दा पुढे करत पक्षीय राजकारणाला पर्याय देण्याचा प्रयत्न केला.

प्रचार थांबताच प्रशासनाने आदर्श आचारसंहितेच्या काटेकोर अंमलबजावणीवर भर दिला आहे. मतदान प्रक्रियेसाठी पोलिस बंदोबस्त वाढवण्यात आला असून संवेदनशील बूथवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. शांततेत आणि निर्भय वातावरणात मतदान व्हावे यासाठी यंत्रणा सज्ज झाली आहे.


आता सर्वांचे लक्ष शनिवारी (ता. ७) होणाऱ्या मतदानाकडे लागले असून मतदार राजा कोणाच्या पारड्यात कौल देतो, याकडे संपूर्ण पूर्व हवेलीचे लक्ष केंद्रित झाले आहे. प्रचाराच्या तोफा थंडावल्या असल्या तरी राजकीय वातावरण मात्र अजूनही तापलेलेच आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## सावधान! 'या' चुकांमुळे फाटू शकतो कानाचा पडदा

**पुणे, ता. ५ :** सध्याच्या धकाधकीच्या जीवनात आणि प्रदूषणाच्या विळख्यात आपण शरीराच्या अनेक नाजूक अवयवांकडे दुर्लक्ष करतो, त्यापैकीच एक म्हणजे 'कान'. कानाचा पडदा फाटणे ही समस्या सध्या तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. केवळ काडीने कान कोरणेच नाही, तर हेडफोनचा अतिवापर आणि संसर्ग ही देखील यामागची मोठी कारणे ठरत आहेत.

कानाचा पडदा नेमका का फाटतो?

कानाचा पडदा हा अत्यंत नाजूक आणि पातळ पापुद्रा असतो. तो फाटण्याची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत:

संसर्ग : कानात पाणी जाऊन किंवा सर्दीमुळे मध्यकर्णात पू साचल्यास पडद्यावर दाब येतो आणि तो फाटतो.

आघात : कानात पिना, काड्या सारख्या वस्तू घातल्याने थेट पडद्याला इजा होते.

मोठा आवाज: फटाके किंवा मोठ्या आवाजाच्या स्फोटामुळे पडदा फाटू शकतो.

विमानाचा प्रवास किंवा डायव्हिंग : हवेच्या दाबातील तीव्र बदलामुळे पडद्याला छिद्र पडू शकते.

लक्षणे कशी ओळखावीत?

जर तुम्हाला खालीलपैकी काही जाणवत असेल, तर सावध व्हा:

१. कानात अचानक तीव्र वेदना होणे.
२. कानातून पाणी, रक्त किंवा पू येणे.
३. कानात सतत 'शिट्टी' वाजल्यासारखा आवाज येणे.
४. ऐकू कमी येणे किंवा चक्कर येणे.

पडदा फाटल्यास काय करावे?

जर तुम्हाला शंका असेल की पडदा फाटला आहे, तर सर्वात आधी तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्या.

पाण्यापासून बचाव: कानात अजिबात पाणी जाऊ देऊ नका. अंघोळ करताना कानात कापसाचा गोळा तेलात बुडवून लावावा, जेणेकरून पाणी आत जाणार नाही.

स्वतः उपचार टाळा: कानात कोणतेही तेल, घरगुती औषध किंवा ड्रॉप्स स्वतःहून टाकूनका. यामुळे संसर्ग वाढून परिस्थिती गंभीर होऊ शकते.

सर्दीपासून सावध राहा: जोरात नाक शिंकरणे टाळा, कारण यामुळे कानावर दाब येऊ शकतो.

उपचार काय आहेत?

बहुतेक वेळा पडद्याला पडलेले छोटे छिद्र योग्य औषधोपचार आणि काळजी घेतल्यास ४ ते ८ आठवड्यांत नैसर्गिकरित्या भरून येते. मात्र, जर छिद्र मोठे असेल किंवा औषधांनी भरून येत नसेल, तर डॉक्टर 'मायरिंगोप्लास्टी' नावाची छोटी शस्त्रक्रिया सुचवतात. ही शस्त्रक्रिया आता अत्यंत प्रगत पद्धतीने आणि दुर्बिणीतून केली जाते, ज्यामध्ये टाकेही पडत नाहीत.

# जि.प. व पंचायत समिती निवडणूक मतमोजणीबाबत सर्वसाधारण सूचना जाहीर

**हवेली, ता. ५ :** हवेली तालुक्यात होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर, मतमोजणी प्रक्रियेबाबत उमेदवार व त्यांच्या प्रतिनिधींनी पाळावयाच्या सर्वसाधारण सूचना निवडणूक प्रशासनाकडून जाहीर करण्यात आल्या आहेत. या संदर्भातील आदेश निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. यशवंत माने, उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समिती हवेली यांच्या कार्यालयाकडून काढण्यात आले आहेत. अशी माहिती माध्यम विभागाचे अधिकारी प्रा. योगेश हांडगे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली.



राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान होणार असून, दि. ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी करण्यात येणार आहे. मतमोजणीसाठी एकूण २५ टेबल्स निश्चित करण्यात आले आहेत. मतमोजणीपूर्वी सकाळी ९ वाजता स्ट्राँगरूम उघडण्यात येणार असून, उमेदवार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यावेळी उपस्थित राहणे आवश्यक आहे. मतमोजणी कक्षात सकाळी ९.३० वाजता प्रवेश देण्यात येणार आहे.

प्रत्येक टेबलसाठी उमेदवारास एक मतमोजणी प्रतिनिधी नेमण्याची मुभा असून, त्यांची नावे व छायाचित्रे विहित नमुन्यात दि. ६ फेब्रुवारी २०२६ पूर्वी सादर करणे बंधनकारक आहे. उशिरा आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत. मतमोजणी कक्षात प्रवेश करताना अधिकृत ओळखपत्र व आधारकार्ड अनिवार्य करण्यात आले आहे.

मतमोजणी कक्षात मोबाईल, कॅमेरा, लॅपटॉप, आयपॅड यांसारख्या प्रतिबंधित वस्तूंना बंदी घालण्यात आली असून, त्यासाठी कोणतीही ठेव व्यवस्था उपलब्ध नसेल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. टपाली मतपत्रिकांची मतमोजणी ही ईव्हीएम मतमोजणीपूर्वी केली जाणार आहे.

मतांमध्ये तफावत आढळल्यास संबंधित फॉर्म, दैनंदिनी व ईव्हीएम वरील नोंदी ग्राह्य धरल्या जातील. मतमोजणी दरम्यान कोणतीही हरकत असल्यास ती निकाल जाहीर होण्यापूर्वी लेखी स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे. त्यानंतरच्या तक्रारींचा विचार केला जाणार नाही.

मतमोजणी प्रक्रियेदरम्यान मतदानाची गुप्तता राखणे कायद्याने बंधनकारक असून, त्याचा भंग झाल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. यशवंत माने यांनी दिला आहे. सर्व उमेदवार व प्रतिनिधींनी प्रशासनास सहकार्य करून शांततेत व नियमांचे पालन करून मतमोजणी प्रक्रिया पार पाडावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## निवडणुकीत राडा करण्यापूर्वीच पोलिसांनी आवळल्या मुसक्या

**पुणे, ता. ५ :** पुणे ग्रामीण जिल्ह्यात सुरू असलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती व आगामी ग्राम पंचायत निवडणुका शांततेत व भयमुक्त वातावरणात पार पडाव्यात यासाठी पुणे ग्रामीण पोलीस प्रशासनाकडून विशेष मोहिम राबविण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर जुन्नर तालुक्यातील धोकादायक इसम अखलाख आसिफ शेख (वय ३२, रा. कागदीवाडा) याला महाराष्ट्र प्रतिबंधात्मक नजरकैद कायदा अंतर्गत स्थानबद्ध करण्यात आले आहे. हा आदेश मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी पुणे श्री. जितेंद्र डुडी यांनी पारित केला आहे. सदर इसमाविरुद्ध चोरी, संगणमत करून चोरी, मारहाण, गंभीर दुखापत करून खुनाचा प्रयत्न, दुचाकी चोरी, महिलांचा पाठलाग करून लैंगिक छळ व विनयभंग अशा सहा गंभीर गुन्ह्यांची नोंद होती. जुन्नर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक किरण अवचर यांनी एमपीडीए कारवाईचा प्रस्ताव मा. पोलीस अधीक्षक पुणे ग्रामीण संदीप सिंह गिल्ल यांच्याकडे सादर केला होता.

# बापमाणसाचं आभाळ फाटलं! अजितदादांच्या फोटोसमोर हात जोडला

### शरद पवारांची अवस्था पाहून कार्यकर्त्यांच्या डोळ्यांत पाणी

**बारामती, ता. ५ :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या अकाली निधनाने महाराष्ट्र अजूनही सावरलेला नाही. प्रशासन, राजकारण आणि सामान्य जनतेवर खोल परिणाम करणाऱ्या या घटनेनंतर राज्यभरातून श्रद्धांजली अर्पण केली जात असून, बारामतीतील पवार कुटुंबीयांचे निवासस्थान असलेल्या सह्योग सोसायटीत गेल्या दोन दिवसांपासून शोकाकुल वातावरण आहे. राज्याच्या विविध भागांतून पदाधिकारी, कार्यकर्ते आणि आप्तस्वकीय कुटुंबीयांचे सांत्वन करण्यासाठी येथे येत आहेत.



या पार्श्वभूमीवर आज राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी सह्योग सोसायटीत येऊन आपल्या लाडक्या पुतण्याला श्रद्धांजली अर्पण केली. बारामतीतील गोविंद बागेतून ते सह्योग सोसायटीत दाखल झाले. वयामुळे आणि दुःखाच्या ओझ्याने पावले थरथरत असतानाही त्यांनी अजित पवारांच्या प्रतिमेसमोर उभे राहून मान खाली घातली आणि हात जोडले. हा क्षण केवळ पवार कुटुंबासाठीच नव्हे, तर महाराष्ट्राच्या राजकारणासाठीही अत्यंत भावनिक ठरला. या वेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, पार्थ पवार, जय पवार, नीता पाटील, विजया पाटील, श्रीनिवास पवार, रोहित पवार, राजेंद्र पवार आणि रणजित पवार उपस्थित होते. संपूर्ण कुटुंब भावूक झाल्याचे चित्र होते. अजित पवार यांच्या निधनानंतर सुनेत्रा पवार यांनी उपमुख्यमंत्रीपदाची शपथ घेतल्यानंतर शरद पवार यांची ही पहिलीच प्रत्यक्ष भेट ठरली.

त्यामुळे ही भेट केवळ कौटुंबिक मर्यादित राहते की त्यातून पुढील राजकीय दिशा ठरते, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. दरम्यान, शरद पवार आजच मुंबईहून बारामतीत दाखल झाले. त्यांनी पार्थ आणि जय पवार यांच्यासह तसेच विद्या प्रतिष्ठानच्या विश्वस्तांसोबत बैठक घेतल्याची माहिती आहे. जय, पार्थ आणि विजया पाटील यांच्यासोबत स्वतंत्र चर्चा झाल्याचेही समजते. या भेटींमुळे पवार कुटुंबाच्या पुढील वाटचालीबाबत आणि राष्ट्रवादी काँग्रेसच्या भविष्यातील भूमिकेबाबत उत्सुकता अधिकच वाढली आहे.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये विवाहित तरुणीवर अत्याचार

**छत्रपती संभाजीनगर, ता. ५ :** ओळखीतून निर्माण झालेली मैत्री आणि त्यातून वाढलेली जवळीक कधी कधी गंभीर परिणाम घडवू शकते, याचे धक्कादायक प्रकरण छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात उघडकीस आले आहे. एका खासगी कंपनीत काम करत असताना ओळख झालेल्या तरुणाने २६ वर्षीय विवाहित तरुणीला जीवे मारण्याची धमकी देत पळवून नेल्याचा आरोप समोर आला आहे. या तरुणाने सुमारे २० दिवस वेगवेगळ्या ठिकाणी फिरवत जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवल्याचा आरोप तरुणीने पोलिसांकडे केला आहे.

गेल्या २० दिवसांपासून दोघेही बेपत्ता होते. अखेर हे दोघे वाळूज एमआयडीसी पोलीस ठाण्यात हजर झाले. तेथेच तरुणीने संबंधित तरुणाविरोधात तक्रार दाखल केल्यानंतर प्रकरण गंभीर बनले. या प्रकरणातील संशयित गिरजाराम बबन पवार (वय २७, रा. रांजणगाव शेणपुंजी, वाळूज एमआयडीसी) असे त्याचे नाव आहे. तक्रारदार तरुणी मूळची फुलंब्री तालुक्यातील असून ती सध्या पतीसोबत वाळूज एमआयडीसी परिसरात राहत होती. ती आणि गिरजाराम एकाच कंपनीत काम करत असल्याने त्यांची ओळख झाली होती. घराजवळच राहणे आणि सततचा संपर्क यामुळे मैत्री झाली. काही काळापूर्वी तरुणीने नोकरी सोडली होती आणि नवीन काम शोधत होती.

२ जानेवारी रोजी सकाळी सुमारे ८.३० वाजता कामाच्या शोधात निघालेली असताना गिरजारामने तिला अडवले. माझ्यासोबत आली नाहीस तर तुझ्या नवऱ्याला मारून टाकीन, अशी धमकी दिल्याचा आरोप तिने केला आहे. भीतीपोटी ती त्याच्यासोबत गेली. दोघे तुळजापूर, अहिल्यानगर, कर्जत आदी ठिकाणी फिरले. या काळात धमक्यांमुळे कोणाशी संपर्क साधता आला नाही, असे तिने तक्रारीत नमूद केले आहे.

## सोन्याचे दागिने हिसकावून पळणारे चोरटे जेरबंद

**पिंपरी-चिंचवड, ता. ५ :** पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखा युनिट-१ ने शहरात दरोडे टाकण्यासाठी नाशिक जिल्ह्यातून आलेल्या दोन तरुणांना अटक केली आहे. या दोघांनी संत तुकाराम नगर आणि चिखली परिसरात महिलांकडून सोन्याचे दागिने हिसकावून नेल्याचे तपासात उघड झाले आहे. गुन्ह्यांचा छडा लावण्यासाठी पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे अक्षय सुनील बोरकर (वय २१, रा. नाशिक) आणि प्रशांत संतविजय यादव (वय १९, रा. गंगापूर, नाशिक) अशी आहेत. या दोघांविरोधात महिलांकडील सोन्याचे दागिने हिसकावून नेल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले होते. गुन्हे शाखा युनिट-१ ने या प्रकरणाचा स्वतंत्र तपास सुरू केला होता.

पोलिस उपायुक्त (गुन्हे) डॉ. शिवाजी पवार यांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिसांनी घटनास्थळांपासून सुरू होणाऱ्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या मदतीने संशयितांचा मार्ग शोधण्यास सुरुवात केली. पोलिस कॉन्स्टेबल महादेव जावळे आणि त्यांच्या पथकाने सुमारे ५०० पेक्षा जास्त सीसीटीव्ही फुटेज तपासले. या तपासात आरोपी पकड टाळण्यासाठी वारंवार आपले मार्ग बदलत असल्याचे दिसून आले.

तांत्रिक तपासानंतर आरोपी नाशिक जिल्ह्यात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिस पथकाने नाशिकमध्ये जाऊन दोघांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी पिंपरी-चिंचवड शहरात दोन ठिकाणी दरोडे टाकल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून सुमारे ३४०००० रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त केले आहेत.

## कोंडी फुटेपर्यंत टोलवसुली बंद; उपमुख्यमंत्र्यांचे कडक आदेश

**पुणे, ता. ५ :** मुंबईपुणे द्रुतगती महामार्गावर गेल्या ३० तासांहून अधिक काळ अभूतपूर्व वाहतूक कोंडी निर्माण झाल्याने हजारो प्रवासी अक्षरशः अडकून पडले होते. बोरघाट परिसरात प्रोपोलीन गॅसने भरलेला टँकर उलटल्यामुळे ही परिस्थिती उद्भवली. ज्वलनशील गॅसची गळती सुरू झाल्याने मोठा धोका निर्माण झाला होता आणि त्यामुळे महामार्गावरील वाहतूक पूर्णपणे थांबवून ती जुन्या महामार्गाकडे वळवावी लागली. परिणामी, मुंबईपुणे प्रवास करणाऱ्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागला.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भविष्यात अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी मुंबईपुणे द्रुतगती महामार्गासाठी स्वतंत्र आपत्कालीन वाहतूक आराखडा तयार करण्याचे स्पष्ट निर्देश दिले आहेत. एमएसआरडीसी आणि पोलिस यंत्रणेला हा आराखडा तातडीने तयार करण्यास सांगण्यात आले आहे.

शिंदे यांनी स्पष्ट केले की, गॅस टँकर अपघातानंतर परिस्थिती अत्यंत धोकादायक होती. गॅस गळतीमुळे मोठे नुकसान आणि जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. त्यामुळे वाहतूक नियोजनाशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

एमएसआरडीसी आणि पोलिसांनी सुमारे २० तास अथक प्रयत्न करून गॅस गळती रोखली. या कामासाठी राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलासह भारत पेट्रोलियम, हिंदुस्तान पेट्रोलियम आणि रिलायन्स यांसारख्या कंपन्यांचे तज्ज्ञही घटनास्थळी बोलावण्यात आले होते.

प्रवाशांना दिलासा देण्यासाठी एमएसआरडीसीकडून पिण्याचे पाणी, बिस्किट्स वाटप करण्यात आले. याशिवाय, वाहतूक सुरळीत होईपर्यंत महामार्गावरील टोल वसुली थांबवण्याचे आदेशही देण्यात आले. शिंदे यांनी मुंबईपुणे मिसिंग लिंक प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असल्याचे सांगत ते तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले. ही लिंक सुरू झाल्यास प्रवासाचा वेळ व अंतर कमी होईल आणि भविष्यात अशा आपत्कालीन प्रसंगी पर्यायी मार्ग उपलब्ध होईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## राष्ट्रवादीत अस्वस्थता; पण शिंदेंची शिवसेना शरद पवारांच्या बाजूने?

**पुणे, ता. ५ :** अजित पवार यांच्या अपघाती निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात निर्माण झालेली पोकळी भरून काढण्याऐवजी, ती अधिक गुंतागुंतीची होत चालली आहे. केंद्रस्थानी आहे दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या संभाव्य विलिनीकरणाची चर्चा आणि त्या चर्चेवरून सत्ताधारी महायुतीतच उमटलेले विसंवादी सूर.

ज्येष्ठ नेते शरद पवार आणि त्यांच्या पक्षातील नेते अजित पवार यांच्याशी विलिनीकरणाबाबत चर्चा झाली होती, असा दावा ठामपणे करत आहेत. त्यासाठी १२ फेब्रुवारी ही तारीखही ठरली होती, असे सांगितले जात आहे. मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपचे इतर नेते ही शक्यता साफ नाकारत आहेत. अजित पवार गटातील नेतेही असा कोणताही निर्णय झालेला नव्हता अशीच भूमिका घेत आहेत.

या सगळ्यात आश्चर्याचा धक्का देणारी भूमिका समोर आली आहे ती महायुतीतीलच शिंदे गटाच्या शिवसेनेची. प्रताप सरनाईक यांनी विलिनीकरणाची कुजबूज सुरू होती, हे वास्तव असल्याचे म्हटले. तर उदय सामंत यांनी सुनेत्रा पवारांचा शपथविधी इतक्या घाईत का झाला, यावर जाहीर शंका उपस्थित केली. संजय शिरसाट यांनी तर माणसापेक्षा खुर्चीला अधिक महत्त्व दिले गेले, अशी थेट टीका केली. या वक्तव्यांकडे भावनिक प्रतिक्रिया म्हणून दुर्लक्ष करता येणार नाही, कारण ती वेगवेगळ्या दिवशी, जाणीवपूर्वक माध्यमांसमोर दिली गेली आहेत. त्यामुळे प्रश्न उभा राहतो की, भाजप विलिनीकरण नाकारत असताना आणि अजित पवार गट सावध भूमिका घेत असताना, शिंदे गट शरद पवारांच्या कथनाला अप्रत्यक्ष दुजोरा का देतो आहे? दरम्यान, राष्ट्रवादीचे नेते प्रफुल्ल पटेल यांनी विलिनीकरणाचा विषय सध्या अजेंड्यावर नसल्याचे स्पष्ट केले असून, सुनेत्रा पवार यांचा शपथविधी हा कर्तव्यभावनेतून घेतलेला निर्णय असल्याचे सांगितले. मात्र त्याच मुद्द्यावर शिंदे गटाकडून व्यक्त होणारी अस्वस्थता, महायुतीतील अंतर्गत समीकरणे बदलत असल्याचा संकेत देत आहे. भाजप आणि शिंदे गटाकडे सरकार चालवण्यासाठी पुरेसे संख्याबळ असतानाही राष्ट्रवादीला सत्तेत सामावून घेण्यात आले होते. आता अजितपवारांच्यानिधनानंतरराष्ट्रवादीमध्ये सुरू असलेल्या पुनर्रचनेच्या पार्श्वभूमीवर, शिंदे गटाची ही शरद पवार पूरक भूमिका केवळ वैयक्तिक मतभेद नसून, भविष्यातील राजकीय पुनर्स्थितीची नांदी ठरते का, याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

## राज्यभरातील १२ जिल्ह्यांतील शाळा, महाविद्यालये आणि सर्व शासकीय कार्यालयांना भरपगारी सुट्टी

**पुणे, ता. ५ :** पुणे, सोलापूरसह राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समिती निवडणुकांचा प्रचार आज (५ फेब्रुवारी) सायंकाळी थांबणार आहे. शनिवारी, ७ फेब्रुवारी रोजी या ठिकाणी मतदान प्रक्रिया पार पडणार असून सोमवारी मतमोजणी होणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित १२ जिल्ह्यांतील शाळा, महाविद्यालये आणि सर्व शासकीय कार्यालयांना भरपगारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय महाराष्ट्र सरकारकडून जारी करण्यात आला आहे.

निवडणूक होणाऱ्या १२ जिल्ह्यांतील ग्रामीण भागात मतदानाच्या पार्श्वभूमीवर सलग तीन दिवस मद्यविक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर उद्योग, खासगी कंपन्या आणि व्यावसायिक आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठीही शनिवारी भरपगारी सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. उद्योग, कामगार आणि खाण विभागाने दिलेल्या आदेशानुसार १८ वर्षांवरील सर्व नोंदणीकृत मतदारांनी मतदानाचा हक्क बजावावा, तसेच मालकांनी कर्मचाऱ्यांना मतदानासाठी आवश्यक सवलत द्यावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे. मतदानाच्या दिवशी ज्या ठिकाणी कर्मचारी नोंदणीकृत मतदार असतील, त्यांना भरपगारी रजा देणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच या १२ जिल्ह्यांतील मतदार इतर जिल्ह्यात काम करत असतील, तरी त्यांनाही सुट्टी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

हा निर्णय उद्योग, ऊर्जा आणि कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापनांना लागू असून त्यामध्ये कारखाने, खासगी कंपन्या, दुकाने, व्यावसायिक प्रतिष्ठाने, निवासी हॉटेल्स, भोजनालये, थिएटर, औद्योगिक युनिट्स, आयटी कंपन्या, शॉपिंग सेंटर्स, मॉल्स आणि रिटेल आउटलेट्स यांचा समावेश आहे.

दरम्यान, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचा प्रचार आज रात्री १० वाजता संपुष्टात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या ७३ गटांसाठी आणि पंचायत समितीच्या १४६ गणांसाठी शनिवारी मतदान होणार आहे. जिल्हा परिषदेसाठी २९९, तर पंचायत समितीसाठी ५२८ उमेदवार रिंगणात आहेत. एकूण २९ लाख ७२ हजार ३५९ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत.उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे प्रचारावर काही प्रमाणात परिणाम झाल्याचे दिसून आले. जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात थेट लढत होण्याची शक्यता असून ही निवडणूक चुरशीची ठरण्याची चिन्हे आहेत.

# एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या तनू भानची ऐतिहासिक कामगिरी!

### एनसीसी प्रजासत्ताक दिन कॅम्पमध्ये सर्वोत्तम एनसीसी कॅडेट; पंतप्रधानांच्या हस्ते सुवर्णपदक प्रदान

**पुणे, ता. ५ :** येथील एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या राष्ट्रीय छात्र सेनेची (एनसीसी) कॅडेट, कनिष्ठ अंडर ऑफिसर (जेएनओ) तनू भान हिने नुकत्याच नवी दिल्ली येथे झालेल्या प्रतिष्ठित एनसीसी प्रजासत्ताक दिन कॅम्पमध्ये (आरडीसी) ३६ महाराष्ट्र बटालियनचे प्रतिनिधित्व करत भारतातील सर्वोत्तम कॅडेट होण्याचा बहुमान पटकावत ऐतिहासिक कामगिरीची नोंद केली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल तिला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सुवर्णपदक देऊन गौरविण्यात आले.



तनू भानसह एमआयटी एडीटी विद्यापीठाचा व्यंकटेश अय्यर यानेही एनसीसी महाराष्ट्र बटालियन मध्ये स्थान मिळवत प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले असून, महाराष्ट्रासह एमआयटी एडीटी विद्यापीठाचा मान उंचावला आहे.

एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या या दोन्ही कॅडेट्सची महाराष्ट्रातून बेस्ट कॅडेट्स म्हणून निवड झाल्यानंतर देशातील १७ डायरेक्टरेट्समधील २० लाखांहून अधिक कॅडेट्समध्ये त्यांनी सर्वोच्च स्तरावर स्पर्धा केली. त्यामध्ये तनू भान हिने उत्कृष्ट शिस्त, नेतृत्वगुण आणि प्रचंड मेहनतीच्या जोरावर सुवर्णपदकावर आपले नाव कोरले, तर व्यंकटेशनेही दाखवलेली जिद्द उल्लेखनीय ठरली.

२८ जानेवारी रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तनू भान हिला सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. तिची ही ऐतिहासिक कामगिरी महाराष्ट्र डायरेक्टरेट, संपूर्ण एनसीसी तसेच एमआयटी एडीटी विद्यापीठासाठी अभिमानास्पद ठरली आहे.

या दोन्ही कॅडेट्सना एमआयटी एडीटी विद्यापीठातील एनसीसी विभागाचे संचालक ब्रिगेडियर मंगेश विटेकर (नि.) तसेच कॅडेट्सच्या असोसिएट एनसीसी ऑफिसर लेफ्टनंट अक्षता परदेशी यांचे मार्गदर्शन लाभले. दोन्ही कॅडेट्सच्या उल्लेखनीय कामगिरीनंतर विद्यापीठाचे कुलपती तथा अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ कराड, कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड, प्रा. डॉ. सुनीता कराड, कुलगुरू डॉ. राजेश एस. तसेच कुलसचिव डॉ. महेश चोपडे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.